# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:20.05.2024** **वारःसोमवार**

---

1..लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातल्या शेवटच्या टप्प्यासाठी मतदानाला सुरुवात;

2.पियुष गोयल, भारती पवार, वर्षा गायकवाड यांच्यासह राज्यातल्या २६४ उमेदवारांचं  भवितव्य मतदान यंत्रात बंद होणार.

3.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं निधन.

4. थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या सात्विक साईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना पुरुष दुहेरीचं विजेतेपद

5.मान्सून निकोबार बेटांवर दाखल; राज्यात विदर्भ आणि मराठवाड्यात वीजांसह पावसाचा  अंदाज

**मतदान-प्रशांत**

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या आणि राज्यातल्या शेवटच्या टप्प्यासाठी आज सकाळी सात वाजता मतदानाला सुरुवात झाली. राज्यात 13 तर देशभरात 49 लोकसभा मतदारसंघांमध्ये आज मतदान होत आहे. मतदान शांततेत आणि सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुरेशी सावली, पिण्याचे पाणी, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्प, स्वच्छतागृह आणि इतर मूलभूत सुविधांसह मतदान केंद्र सज्ज आहेत. संबंधित अधिका-यांना आणि राज्य यंत्रणांना उष्ण हवामानाचे व्यवस्थापन करण्यासाठी पुरेशा उपाययोजना करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. राज्यात या टप्प्यात २४ हजार ५७९ केंद्रांवर मतदान होणार आहे.

धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, उत्तर मुंबई, उत्तर-पश्चिम मुंबई, उत्तर पूर्व मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मध्य मुंबई आणि दक्षिण मुंबई या लोकसभा मतदारसंघात मतदान होत आहे.

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदार संघासाठी ७ हजार मतदान यंत्रांचे वाटप करण्यात आले असून ४ हजार कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. दिंडोरीसाठी १ हजार ९२२ तर नाशिकसाठी १ हजार ९१० मतदान केंद्र आहेत.

ठाणे लोकसभा मतदारसंघांमध्ये 24, कल्याण लोकसभा मतदारसंघांत 28, धुळे लोकसभा मतदार संघात 18 आणि भिवंडी मतदारसंघात 17 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

दरम्यान ठाणे जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी तसंच मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. गुलाबी रंगाने महिला, पिवळ्या रंगाने युवा, तर निळ्या रंगाने दिव्यांग मतदान केंद्रे तयार केली आहेत. भिवंडीतील मतदान  केंद्रावर आगरी कोळी संस्कृतीचे दर्शन होणार आहे.

जुहू चौपाटीवर वाळूशिल्पकार लक्ष्मी गौड यांनी वाळूशिल्प साकारून मतदान करण्याचा संदेश दिला आहे.

या टप्प्यात सर्वाधिक मतदान केंद्रे मुरबाडमध्ये तर सर्वात कमी उल्हासनगरमध्ये आहेत.

ठाणे जिल्ह्यात सहा हजार ६०४ मतदान केंद्रांपैकी ३ हजार ३२५ मतदान केंद्रावर वेबकास्टिंगची सुविधा देण्यात येणार आहे. तर अत्यावश्यक सेवेतील ७३३ कर्मचाऱ्यांनी टपालाद्वारे मतदानाचा हक्क बजावला आहे.

धुळ्यातदेखील पोलिस प्रशासनाने मतदान शांततेत पार पडण्याच्या दृष्टीने जय्यत तयारी केली आहे. याबाबत पोलिस अधीक्षक श्रीकांत धीवरे यांनी अधिक माहिती दिली. ते म्हणाले... . . . . . .

राज्यात एकंदर २६४ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात असून अरविंद सावंत, पियुष गोयल, अमोल किर्तीकर, उज्वल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे, भारती पवार आदी प्रमुख उमेदवारांचं भवितव्य आज मतदान यंत्रात बंद होणार आहे.

राज्यातला आजचा मतदानाचा शेवटचा टप्पा आहे; मात्र उर्वरित २ टप्प्यातील मतदान 1 जूनपर्यंत होणार असून 4 जून रोजी मतमोजणी होणार आहे.

**<u>रोकड</u>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगानं विविध ठिकाणांहून एकंदर ८ हजार ८८९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये जवळपास ४ हजार कोटी रुपयांच्या अमली पदार्थांचा समावेश आहे.

**<u>आषाढीवारी</u>**

पंढरपूर इथं येत्या १७ जुलै रोजी आषाढी एकादशी सोहळा होत आहे. यात्रा कालावधीत भाविकांची होणारी गर्दी विचारात घेऊन ७ ते २४ जुलै या कालावधीत विठ्ठल-रुक्मिणी मातेचं दर्शन २४ तास सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. यासाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून आवश्यक ते नियोजन करण्यात आलं असल्याचं हिंदुस्थान समाचार या वृत्तसंस्थेनं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

दरम्यान, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउली आणि जगदगुरु संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहोळ्याच्या आगमनावेळ, त्यांच्या स्वागतासाठी मोठ्या आवाजात ध्वनिवर्धक लावण्यास किंवा स्पीकरच्या भिंती उभ्या करण्यास पुणे जिल्हा प्रशासनानं मनाई केली आहे. वारकरी महामंडळानं ही मागणी केली होती.

**<u>उजनी</u>**

सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा मोठ्या प्रमाणावर घटत आहे. त्यातच दुष्काळाचे संकट ओढवल्यानं उजनीच्या काठावरची

ऊस, केळी आदी नगदी पिके पाण्यावाचून सुकून चालली आहेत. यंदा उजनी धरणात केवळ ६० पूर्णांक ६६ टक्के पाणीसाठा होऊ शकला होता.

**<u>विद्युत आयएसओ</u>**

वीज ग्राहकांना गुणवत्तापूर्ण आणि अखंड सेवा देण्यासाठी उपकेंद्रात करण्यात आलेल्या कार्यामुळे विदर्भात प्रथमच चार विद्युत उपकेंद्रांना आयएसओ मानांकन मिळालं आहे. ही चारही उपकेंद्रे अकोला शहरातील आहेत

**जाहिरात फलक**

लातूर शहरातील अनाधिकृत जाहीरात फलकांवर महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे. खाजगी मालमत्तांवर लावण्यात आलेले जाहिरात फलक त्याच्या सांगाडयासह काढून न घेतल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.

**प्लॅस्टिक**

सांगली जिल्ह्यात कवठेमहांकाळ तालुक्यातील हिंगणगाव इथं प्लॅस्टिक निर्मूलन दिवस राबविण्यात आला. यावेळी 47 किलो प्लास्टिकच संकलन करण्यात आलं. या मोहिमेमुळ सांगली जिल्हा प्लास्टिक मुक्त करण्याचा ध्यास असल्याच मत मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी यावेळी व्यक्त केलं.

**गाळ**

राज्य शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शेती योजनेला बुलडाणा शहरालगत येळगाव धरण परिसरात सुरूवात झाली. विविध शासकीय संस्था, खाजगी कंपन्या आणि राज्य शासनानं संयुक्तपणे हा उपक्रम राबवला आहे. या योजनेचा लाभ शेतकऱ्यांनी घेण्याचं आवाहन उपविभागीय अधिकारी शरद पाटील आणि मुख्याधिकारी गणेश पांडे यांनी केले

**निधन**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं काल सातारा जिल्ह्यातल्या भुईंज इथल्या निवासस्थानी वृद्धापकाळाने निधन झालं. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. भुईंज गावचे सरपंच म्हणून त्यांनी राजकीय कारकिर्दीला प्रारंभ केला. वाई-खंडाळा विधानसभा मतदार संघाचं ४ वेळा तर सातारा लोकसभा मतदार संघाचं ३ वेळा त्यांनी प्रतिनिधीत्व केले. त्यानंतर त्यांनी १९९७मध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली. कृषी, सहकार आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केलं. प्रतापराव भोसले यांच्या निधानाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि वेदनादायी असल्याच्या भावना कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी व्यक्त केल्या आहेत.

**बॅडमिंटन**

भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी या जोडीने थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. बँकॉकमध्ये काल झालेल्या अंतिम सामन्यात सात्विक आणि चिराग या जोडीने चीनच्या प्रतिस्पर्धी जोडीचा २१-१५, २१- १५ अशा सरळ सेट्समध्ये पराभव केला.

**तापमान**

बुलडाणा जिल्ह्याच्या तापमानात गेल्या काही दिवसांमध्ये वाढ होत आहे. वाढत्या तापमानामुळे जिल्ह्यातील शासकिय रुग्णालयाच्या उष्माघात कक्षामध्ये रुग्णांच्या संख्येत सातत्याने वाढ होतांना दिसत असून आतापर्यंत २१ रुग्णांची नोंद झाली आहे. नागरिकांनी उष्माघातापासून बचाव करावा असं आवाहन जिल्हा प्रशासनाच्यावतीनं करण्यात आलं आहे.

**पाऊस रत्नागिरी**

रत्नागिरी जिल्ह्याच्या काही भागांत काल विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. पुण्यातही काल हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला.

**हवामान-**

मान्सून निकोबार बेटांवर दाखल झाला असल्याचं हवामान विभागाने काल जाहीर केलं. येत्या ३१ मे पर्यंत मोसमी पाऊस केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दरम्यान, येत्या २४ तासात मध्य महाराष्ट्राच्या काही भागात पावसाचा अंदाज आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात सोसाट्याचा वारा आणि वीजांसह पाऊस पडेल, तर कोकणात उष्ण आणि दमट हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.